क्र.का.३/संगणक/आय-सरिता/१३/४१९
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक - ०५/१२/२०१३.

**विषय** : - आय-सरिता प्रणालीमध्ये ‘‘view 7/12’’ सुविधेचा वापर करणेबाबत.

<u>प्रस्तावना :</u>

राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत **ई-फेरफार** आज्ञावलीची अंमलबजावणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाचा सर्व्हर व आय-सरिता प्रणालीचा सर्व्हर यांची जोडणी करण्यात आली आहे.

या प्रक्रियेतील प्राथमिक टप्पा म्हणून, दस्तांकित मिळकतीचा ७/१२ उतारा, आय-सरिता प्रणालीमधून पहाण्याची ‘‘view 7/12 ’’ ही सुविधा आय-सरिता प्रणालीमध्येच उपलब्ध करुन देण्यात आली आहे व त्याचे प्रात्यक्षिक माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या विभागवार कार्यशाळांमध्ये सर्व दुय्यम निबंधक व संबंधित कर्मचा-यांना दाखविण्यात आले आहे.

दस्तऐवजातील मिळकतीच्या मालकी हक्काची पडताळणी करण्याची जबाबदारी दुय्यम निबंधक यांची नाही व त्या कारणासाठी दस्त नोंदणी दुय्यम निबंधक यांना नाकारता येत नाही अशी कायदेशीर स्थिती असली तरी ७/१२ उता-याची स्थिती मिळकत खरेदी घेणा-या पक्षकाराच्या निदर्शनास आणून देणे हा या प्राथमिक टप्प्याचा उद्देश आहे.

सध्या पुणे जिल्हयातील मुळशी, नाशिक जिल्हयातील दिंडोरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली, लातूर जिल्हयातील औसा, बुलढाणा जिल्हयातील बुलढाणा व नागपूर जिल्हयातील सावनेर या तालुक्यातील ७/१२ च्या pdf file भूमी अभिलेख विभागाच्या सर्व्हरवर उपलब्ध आहेत व इतर तालुक्यांसाठी कार्यवाही सुरु आहे. याप्रमाणे उपलब्धतेबाबत त्या त्या सह जिल्हा निबंधकांना/दुय्यम निबंधकांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

सबब,राज्यातील सर्व दुय्यम निबंधक यांना सूचना देण्यात येत आहेत की,

सूचना -

(१) वर नमूद उद्देश विचारात घेऊन सर्व संबंधित दस्तांच्या बाबतीत या सुविधेचा शंभर टक्के वापर करावा.

(२) ७/१२ उपलब्ध झाल्यास, तो संगणकाच्या पडद्यावर सर्व संबंधित पक्षकारांना पहाण्यास सांगावे व त्यांनी तो पाहिल्यानंतर, आय-सरिता प्रणालीमध्ये "७/१२ पक्षकारांना दाखविला" हा पर्याय निवडावा.

(३) ७/१२ उपलब्ध न झाल्यास, "७/१२ उपलब्ध नाही" हा पर्याय निवडा.

(४) या दोन्हीपैकी निवडलेला पर्याय, नोंदणीपूर्व गोषवा-यामध्ये सरतेशेवटी मुद्रित झाला आहे याची खातरजमा करावी.

(५) तसेच साधारण किती दस्तऐवजांच्या बाबतीत ७/१२ उतारा उपलब्ध होतो, उपलब्ध झालेला ७/१२ कितपत अद्ययावत आहे याचे सर्वसाधारण निरीक्षण नोंदवून दरमहा सह जिल्हा निबंधक यांचेकडे सादर करावे.

संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक/ सह जिल्हा निबंधक यांनी याबाबत उचित संनियंत्रण करावे.

सही/-(एस.चोक्कलिंगम्)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

सर्व दुय्यम निबंधक. (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत).

प्रत :

१) मा.जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख यांना माहितीस्तव.
२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
३) सर्व सह जिल्हा निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत).
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

निर्गमित

नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक),
महाराष्ट्र राज्य,पुणे.